अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

MO.9860898564

संपादक - दिपक थोरात

# प्लॉट खरेदीत फसवणूक करणाऱ्या अंकुश नाना मोरे यांच्यावर कारवाई कधी

बीड । प्रतिनिधी

शहरातील बलगुजार भागात सर्वे नंबर १७१ मधील प्लॉटची खरेदी व्यवहार पोटी पाच लक्ष रुपये ऍडव्हान्स घेऊन इतर इसमाला तो प्लॉट विक्री करत असल्याने प्लॉट खरेदी करारापोटी घेतलेले पाच लक्ष रुपये घेऊन फसवणूक करणाऱ्या अंकुश नाना मोरे यांच्या विरोधात जिल्हा पोलीस अधीक्षकांना फसवणूक झाल्या प्रकरणी कारवाई करण्यासाठी शेख राजू महबूब, मसु सुंदरराव इंगोले यांनी तक्रार दिली आहे.शहरातील बलगुजर भागात असणाऱ्या प्लॉटची रोळास गाव येथील अंकुश नाना मोरे यांच्यासोबत सर्वे नंबर १७१ मधील प्लॉटची विक्री करण्याचा व्यवहार झाला होता यामध्ये दिनांक २४ ८ २०१८ रोजी हिसार पोटी दहा हजार रुपये व दिनांक २८ ८ २०२३ रोजी चार लक्ष ५० हजार रुपये देण्यात आले व प्लॉट खरेदीचा तारीख दिनांक १५ /१० /२०२३ ठरली प्लॉटचा व्यवहार झाल्याने तो प्लॉट घोडके नामक व्यक्तीसोबत विक्री करण्याचा करार शेख व इंगोले यांनी केला मात्र गुंठेवारी वेगवेगळी झाली नसल्याने दिनांक १५ /१०/२०२३ रोजी रजिस्ट्री होऊ शकली नाही, यानंतर ज्या व्यक्तीला आम्ही तो प्लॉट विक्री केल्याचा करार केला होता त्या व्यक्तींनी सदरील प्लॉट हा विक्री झाला असल्याचे सांगितले. यानंतर आम्ही अंकुश मोरे यांना यासंबंधी विचारणा केली असता त्यांच्याकडून मिळू लागली, प्लॉट विक्रीचा करार करून दुसऱ्याच व्यक्तीला प्लॉट विकणाऱ्या व आमची पाच लाख रुपये घेऊन फसवणूक करणाऱ्या अंकुश नाना मोरे यांच्यावर फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा नोंद करण्याची मागणी जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे शेख राजू महबूब मसू सुंदरराव इंगोले यांनी केली आहे.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -६९ | मंगळवार दि.२८ नोव्हेंबर २०२३ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -69 | TUESDAY DT.28 NOVEMBER 2023 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# देवदर्शनाला जाताना आष्टीत कार झाडावर आदळली;दोन जागीच ठार;दोन जखमी



आष्टी : शिर्डी येथून तुळजापुरकडे देवदर्शनासाठी निघालेल्या भाविकांची कार नियंत्रण सुटल्याने भरधाव वेगात झाडावर आदळली. या भीषण अपघातात चालकासह एक महिला जागीच ठार झाली. तर दोन भावंडे गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात मंगळवारी सकाळी अकरा वाजेच्या दरम्यान आष्टी तालुक्यातील पोखरी येथे घडली.शिर्डी येथील महिला आपल्या दोन मुलासह तुळजापुर येथे देवदर्शनासाठी आज सकाळी कारने ( क्रमांक एम.एच ०३,बी सी.६७३६ ) बीड नगर राष्ट्रीय महामार्गाने जात होत्या. दरम्यान, आष्टी मार्गे जात असताना सकाळी अकराच्या सुमारास चालकाचा स्टेअरिंग वरील ताबा सुटल्यानंतर कार रोड लगतच्या झाडावर आदळली. कारचा वेग जास्त असल्याने या भीषण अपघातात चालक रूपेश बबन भेडे, अनिता राहुल इंगोले ( ३३ ) या दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर अभय राहुल इंगोले ( १२), अनोप राहुल इंगोले (१४, सर्व रा.शिर्डी ) हे दोघे भावंडे गंभीर जखमी झाले आहेत. नगर व जामखेड येथील रूग्णालयात या दोन भावंडावर उपचार सुरू आहेत. माहिती मिळताच घटनास्थळी आष्टीचे पोलीस निरीक्षक संतोष खेतमाळस, पोलीस हवालदार काळे, वाणी साहेब, कन्हेरे यांनी भेट देत पंचनामा करत चालक व महिलेचा मृतदेह आष्टी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आला आहे.

# सता असो वा नसो पकजाताई प्रितमताई विकासाची गंगा आणतातच कोट्यवधींच्या रस्त्यांच्या कामांचा खा. प्रीतमताईंच्या हस्ते उद्घाटन संपन्न

बीड । प्रतिनिधी

सोमवारी जिल्ह्यातील कोट्यवधींच्या रस्त्यांच्या कामांचा खा. प्रीतमताई मुंडे यांच्या हस्ते श्रीगणेशा करण्यात आला. तसेच दिव्यांग पूर्व तपासणी शिबिरात पात्र ठरलेल्या पाटोदा तालुक्यातील लाभार्थ्यांनाही निःशुल्क सहाय्यक साधनांचे खा. प्रीतमताईंनी वितरण करून त्यांना मोठा आधार देण्याचे काम खऱ्या अर्थाने केले. त्यांच्याकडून सुरू असलेल्या या कामाचे संप संपूर्ण जिल्हाभरातून कौतूक केले जात आहे. स्व. गोपीनाथराव मुंडे यांनी नेहमीच बीड जिल्ह्याचे हित आपल्या डोळ्यासमोर ठेवून काम केले, त्यांच्या

पश्चात अगदी त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून लोकनेत्या पंकजाताई आणि खा. प्रीतमताई मुंडे ह्या धडाडीनेआणि ताकतीने काम करीत आहेत. मागच्या दहा वर्षात खा. प्रीतमताईनी बीड जिल्ह्यातील प्रत्येक प्रश्नरस्त्याच्या माध्यमातून स्थानिक नागरिकांना दळणवळनाची दर्जेदार सुविधा मिळणार - खा. मुंडेगोर-गरिब दिव्यांगांनाही निःशुल्क सहाय्यक साधनांचे वितरण करून ताईंनी दिला मोठा आधारसोडविण्याचा प्रयत्न खऱ्या अर्थाने केलेला आहे. महामार्गांसह नगर- बीड-परळी उपस्थित होते. या रस्त्याच्या माध्यमातून स्थानिक नागरिकांना दळणवळनाची दर्जेदार सुविधा मिळणार असून ग्रामीण भागाला मुख्य रस्त्यांशी जोडणारा हा रस्ता परिसरातील नागरिकांसाठी वाहिनीची भूमिका पार पाडणार असल्याचे खा. प्रीतमताईंनी यावेळी म्हटले आहे. तसेच दिव्यांग पूर्व तपासणी शिबिरात पात्र





ठरलेल्या पाटोदा तालुक्यातील लाभार्थ्यांनाही निःशुल्क सहाय्यक साधनांचे खा. प्रीतमताईंनी वितरण करून त्यांना मोठा आधार देण्याचे काम केले. या कार्यक्रमाला विधानसभा सदस्य आ. बाळासाहेब आजबे, अजय धोंडे, नगराध्यक्षा दीपाली जाधव, सुधीर घुमरे, मधुकर गर्जे, भगवान येवले, पांडुरंग नागरगोजे, सुवर्णा लांबरुड यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# गेवराई तालुक्यात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा तडाखा

## खरीप हंगामातील कापूस, तूर पिकासह रब्बी हंगामातील ज्वारी, कांदा, हरभरा, गहू व फळबागांचे नुकसान



गेवराई । प्रतिनिधी

**गेवराई तालुक्यात रविवारी रात्री वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा जोरदार तडाखा बसला आहे. जिल्ह्यात रविवारी मध्यरात्रीपासून सर्वत्र पाऊस झाला असून हिवाळ्याच्या दिवसांत अवकाळी पावसाच्या नैसर्गिक संकटामुळे शेतकरी पुन्हा एकदा आर्थिक संकटात सापडला आहे. खरीप हंगामातील कापूस, तूर पिकासह रब्बी हंगामातील ज्वारी, कांदा, हरभरा, गहू व फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.**

गेवराई शहरासह तालुक्यातील उमापूर, मादळमोही, जातेगाव, चकलांबा, तलवाडा, सिरसदेवी, पाडळसिंगी, कोळगाव, सुशी वडगाव, धोंडराई परीसरात अचानक झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसाने रविवारी रात्रीपासून वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने हजेरी लावली. हवामान विभागाने राज्यात तीन दिवस अवकाळी पावसाची शक्यता वर्तवली होती. रविवारी रात्रीच्या सुमारास गेवराई तालुक्यातील विविध भागांत तसेच शहरात वादळी वारा सुटला. विजांच्या कडकडाटासह पावसाला सुरुवात झाली. अवकाळी पावसाच्या नैसर्गिक संकटामुळे गेवराई तालुक्यातील शेतकरी पुन्हा एकदा आर्थिक संकटात सापडले आहेत. खरीप हंगामातील कापूस, तूर पिकासह रब्बी हंगामातील ज्वारी, कांदा, हरभरा, गहू व फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शासनाने नुकसानग्रस्त भागात तात्काळ पंचनामे करुन मदत करावी अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

# लोनगाव ग्राम पंचायतीत बिनविरोध उपसरपंचपदी बंडू चव्हाण याची निवड

माजलगाव । प्रतिनिधी

ग्रामपंचायत कार्यालय लोणगाव तालुका माजलगाव येथे दिनांक २८ ११ २०२३ रोजी उपसरपंच निवडणूक दुपारी दोन वाजता नामनिर्देशन पत्र एकच आल्यामुळे श्री बंडू रावण चव्हाण यांची उपसरपंच पदी बिनविरोध निवड करण्यात आलीआहे .सरपंच नारायण निवृत्ती राऊतसदस्य आशाबाई व्यंकटराव कोळसे निकिता नितीन सोनकांबळे अरुणा शरद पवार शितल संजय पवार सुदाम देवराव आलाट बालासाहेब धोंडीराम रासवे दादासाहेब बन्सी मुंडे नादान वजीर सय्यद ११ पैकी नऊ सदस्य असल्यामुळे बिनविरोध निवड करण्यात आली सर्व शांततेत गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.तर नऊ सदस्य हजर होते विरोधी दोन सदस्य मतदानास गैरहजर राहिले. पण बंडू चव्हाण यांची लोणगाव ग्राम पंचायत उपसरपंचपदी बिनविरोध निवड करण्यात आली.सर्व गावकरी यांनी सत्कार शुभेच्छा देत जल्लोषात स्वागत करण्यात आले यावेळी उपसरपंच नवनिर्वाचित बंडू चव्हाण यांनी सांगितले की मी बीड जिल्ह्यातील नव्हे तर



महाराष्ट्रातील सर्व स्तरांमध्ये शासकीय दरबारी जाऊन लोणगाव ग्रामपंचायत ते मुख्यमंत्री कार्यालय महाराष्ट्र राज्य मंत्रालय येथे जाऊन संबंधित लोणगाव ग्रामपंचायत गावच्या समस्या शासन दरबारी मांडून निधी खेचून आणत विकास कामे करेल आपण दिलेल्या विश्वास व विश्वासाला कधीही तळा जाऊ देणार नाही असाही शब्द सरपंच नवनिर्वाचित बंडू चव्हाण यांनी यावेळी दिला आहे व सर्व मस्त गावकरी मंडळींचे आभार मानून सदैव जनसेवेसाठी हजर राहील असेही नवनिर्वाचित उपसरपंच बंडू चव्हाण यांनी म्हटले आहे

# जनतेच्या मनावर अधिराज्य गाजवणारा कलेक्टर दीपाताई मुंढे मुधोळ.जिल्ह्यावासियाकडून शुभेच्छांचा वर्षाव

## सरकारी दवाखान्यात रक्तदान करणाऱ्या दिपा मुधोळ ठरल्या पहिल्या जिल्हाधिकारी

बीड । प्रतिनिधी

सदैव बीड जिल्ह्यातील जनतेसाठी तत्पर कार्य करत एक वेगळीच छाप निर्माण करायला करणाऱ्या व बीडच्या जिल्हा अधिकारी पदाचा पदभार स्वीकारणाऱ्या दीपाताई मुधोळ मुंडे ह्या बीड जिल्ह्याच्या सुनबाई आहेत असा सूर बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेमध्ये निघत आहे यामध्ये त्यांनी आल्यानंतर बीड जिल्ह्यातील जनतेच्या समाधानकारक मनात घर केला आहे तर यावेळी दीपाताई मदर मुंडे यांनी बीडचा पदभार घेतल्यानंतर सर्वप्रथम बीड जिल्ह्यातील प्रश्न सोडविण्यासाठी त्या रस्त्यावरती उतरल्या मग शासन दरबारचा प्रश्न असेल शिक्षण विकास कामाचे प्रश्न असतील जनतेचे तहसील पोलीस स्टेशन पुरवठा विभाग महसूल सह अन्य प्रश्नावरती दीपाताई मुंडे यांनी स्वतः जनतेला वेळ देऊन एक आगळ्यावेगळ्या प्रकारचे काम करत जनतेच्या मनावरती अधिराज्य गाजवत बीड मधील जनतेला सदैव आठवणीत राहतील असे कार्य करत दीपाताई मुंडे यांनी एक चांगले काम करणारा जिल्हाधिकारी व सर्वसामान्य माणसाचा जिल्हाधिकारी कसा असतो हे दाखवून दिले आहे यामध्ये जिल्हाधिकारी दिपा मुधोळ ह्या एक कर्तव्यदक्ष अधिकारी आहेत. त्यांचे काम खरोखरच



कौतुकास्पद आणि जिल्ह्याच्या फायदाचे आहे. त्यांच्या कामातून अनेकांना न्याय मिळत आहे. परळी हे त्यांचे सासर असून त्यांच्या कामावर संपूर्ण जिल्हा खऱ्या अथनि खुश आहे. त्यामुळेच अभिष्टचिंतना- निमित्त काल संपूर्ण जिल्हाभरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव झाला. आपला वाढदिवस भव्य दिव्य प्रमाणात साजरा न करता एक राष्ट्रीय कर्तव्य म्हणून सरकारी दवाखान्यात जाऊन रक्तदान करणाऱ्या दीपाताई मुधोळ मुंडे ह्या बीडच्या पहिल्या जिल्हाधिकारी ठरल्या आहेत. त्यांचे या राष्ट्रीय कार्याबद्दल त्तरातून अभिनंदन होत आहे. मुधोळ मुंडे यांचे सासर परळी तालुक्या वाडी हे आहे. मराठवाड्याचे आयकर अ स मुंडे हे त्यांचे पती असून आपल्या कर्तव्य जिल्ह्याला कसा फायदा होईल याअनुषंगाने खऱ्या अर्थान काम करीत आहेत. जिल्हाधि या पदभार स्विकारून जिल्हाधिकारी दिपा मु आणखी एक वर्षही पुर्ण झालेले न म्यानच्या काळात त्यांनी सदैव बीड जिल्ह्याचे व्यासमोर ठेवूनच काम केलेले आहे. य ह्याला आज मोठा फायदा होत आहे. कोण तात्काळ मार्गी लावण्यात त्यांचा हातखंडा उ ळेचि संपूर्ण जिल्हा त्यांच्यासोबत ताकतीने कर्तव्यदक्षपणामुळे एक लोकप्रिय जिल्हाधि नही त्यांच्याकडे पाहिले जात आहे. व ष्टचिंतनानिमित्त संपूर्ण जिल्हाभरातून त्यांच् छांचा वर्षाव झाला. आपला वाढदिवस भव्य ’ गात साजरा न करता एक राष्ट्रीय कर्तव्य म री दवाखान्यात जाऊन रक्तदान करणाऱ्या ळ मुंडे ह्या बीडच्या पहिल्या जिल्हाधिकारी ठ त. त्या काल परळीत शासकीय रेस्ट हाऊस टनासाठी आल्या होत्या. त्यापूर्वी त्यांनी प जिल्हा क्षणालयात येऊन रुग्णालयाची पाहणी के । वाढदिवसाच्या निमित्ताने रक्तदान केले. रक्ता र्वश्रेष्ठ दान आहे, यामुळे अनेकांचे प्राण तात. परळी उपजिल्हा रुग्णालयात वैद्यन क्षक डॉ. अरुण गुट्टे यांनी त्यांचे यावेळी स्व जिल्हाधिकारी असतानाही अतिशय साधेप दिवसानिमित्त रक्तदान करून राष्ट्रीय ब विणाऱ्या दिपा मुधोळ यांचे सर्वत्र अभिनंदना ✻. सर्वात महत्वाचे म्हणजे संपूर्ण हावासियांना न्याय देणाऱ्या जिल्हाधिकारी ळ यांच्या खांद्याला खांदा लावून त्यांचे बास मुंडेही मोठठ्या ताकतीने काम क त. येणाऱ्या काळात नक्कीच या दोघा पंचा बीड जिल्हावासियांना मोठा फायाशिवाय राहणार नाही.






# कलेतील सारे प्रवाह महाराष्ट्राने स्वीकारले-माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर

## दीपमाळेवर संस्कार भारतीचा नेत्रदीपक दीपोत्सव

बीड/वार्ताहर

देशातील विविध कला महाराष्ट्राने स्वीकारून आपले कलाक्षेत्रही विस्तारले ,रसिकांनीही या स्वतंत्र वैशिष्ट्य असणाऱ्या कलांना जनाश्रय दिला असे मत माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी व्यक्त केले.येथील खंडोबा मंदिर दीपमाळेच्या परिसरात संस्कार भारती बीडचा दीपोत्सव संपन्न झाला, यावेळी विविध गायन वादन स्पर्धेत बक्षिसे जिंकलेल्या कलावंतांची सुरेख मैफल संपन्न झाली.

प्रतिवर्षी प्रमाणे त्रिपुरारी पोर्णिमेनिमित्त संस्कार भारती बीडच्या वतीने येथील ऐतिहासिक दीपमाळ परिसर हजारो पणत्या,आकर्षक रंगानी आणि ताल सुरात नाहून निघाला.याप्रसंगी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते संगीत शिक्षक आणि विविध स्पर्धात बक्षीस मिळवलेल्या कलावंताचा स्मृतिचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला,याच कलावंतानी नंतर दोन तास विविध गाणी गाऊन मैफल संपन्न केली,ऐकल तबला वादन ,बासरी वादन आणि भरतनाट्यम शैलीतील नृत्य या कार्यक्रमाचे विशेष वैशिष्ट्य ठरले.कार्यक्रमास माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते,व्यासपीठावर संस्कार भारतीच्या देवगिरी प्रांताचे अध्यक्ष भरत लोळगे,प्रांत प्रचार प्रमुख महेश वाघमारे, संस्कार भारती बीडचे अध्यक्ष प्रमोद वझे हे उपस्थित होते. यावेळी जयदत्त क्षीरसागर यांनी कलावंत आणि संगीत शिक्षकांचे कौतुक केले,भारतीय संस्कृतीत कला क्षेत्राचे विशेष योगदान असून महाराष्ट्राने उत्तर भारत,दक्षिण



भारतातील कला प्रकारही आपली पारंपरिक कला,लोककला जपत आत्मसात केल्याचे ते म्हणाले,विविध नामवंत कालावंतांचाही उल्लेख करीत त्यांनी गौरव केला, नव्या माध्यमांनीही कला आणि कलावंताना प्रोत्साहन मिळाले असे निरीक्षणही क्षीरसागर यांनी नोंदवले, धकाधकीच्या जीवनात संगीत,नाटक,चित्रपट हेच विरंगुळा देऊ शकतात असे सांगत बीड संस्कार भारतीच्या कनकालेश्वर महोत्सवाचा त्यांनी विशेष उल्लेख केला. प्रास्तविक प्रमोद वझे यांनी केले,त्यांनी संस्कार भारतीच्या विविध उपक्रमांची माहिती दिली,कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन गणेश तालखेडकर यांनी तर आभार प्रदर्शन डॉ.राहुल पांडव यांनी केले.यावेळी कु.सुरभी निराळे,स्वराली साळुंके,देवकी साळुंके,देव मुळे, राधेश्याम चिरके अर्णव कोळेकर, अर्णव खडकीकर, श्रध्दा ठोसर, श्रावणी जोशी ओंकार देशपांडे (बासरी),अद्वय पोपळे, ओंकार कुलकर्णी, वेदांत देशमुख, पल्लवी पंडीत,पुनम धुताडमल रश्मी थिगळे, वैष्णवी सर्वज्ञ(भरत नाट्म) यांनी कला सादर केली.त्यांना संवादीनीवर नामदेव साळुंके,सुदर्शन धुतेकर, महेश कुलकर्णी,सचिन मार्गे यांनी तर तबल्यावर प्रकाश मानुरकर,बालाजी मानगिरे, योगीराज वाघमारे यांनी साथ संगत केली.दीपमाळ प्रांगणात संस्कार भारतीची भव्यदिव्य रांगोळी काढून त्यावर हजारो दिव्यांची आरास करण्यात आली. दीपोत्सव यशस्वी करण्यासाठी महेश देशमुख, अशोक कुलकर्णी,दत्ता घोडके,अनिल कुलकर्णी, जगदीश जाधव, प्रशांत सुलाखे,गुरु कुलकर्णी,डॉ.रविंद्र शिवणीकर,सतिश सुलाखे यांनी परिश्रम घेतले.



## कांबी मजरा ग्रामपंचायतच्या उप सरपंच पदी शिव सेनेच्या

## शेख अखतरबी फत्तु मामु यांची निवड

**गेवराई तालुक्यातील आती महत्वाची मानली जाणारी नंदपुर कांबी ग्रामपंचायत सरपंचाचा पदभार व उप सरपंच निवडणूकीसाठी शेख आखतरबी फत्तु मामु यांनी अर्ज दाखल केला होता. प्रतिप्रधी विरोध गटाकडून सुनिता विजय पवार आसा आर्ज दाखल करण्यात आला होता. निवडणूक मतदान प्रक्रिया पार पडली**

त्या मध्ये शेख आखतरबी फत्तु मामु यांना १० पैकी ८ मते मिळाले व सुनिता पवार यांना फक्त ०२ मतांवर समाधान मनाला लागले असल्याने शेख आखतरबी फत्तु मामु विजयी झाल्या असल्याने गावातील नागरिक मोठ्या उत्साहाने सरपंच उप सरपंच यांचे अभिनंदन करत होते. सोबत.माजी चेअरमन रामेश्वर जाधव. चंद्रसेन उबाळे.माजी ग्रामपंचायत सदस्य काशिनाथ अडागळे,माजी ग्रामपंचायत सदस्य गोरख उबाळे,मोहन उबाळे ,कलिंदर शेख, माणिक उबाळे, अशोक उबाळे, अनंत उबाळे, भानुदास विव्हळ,दत्तु उबाळे, हारुन शेख, संदीप उबाळे,ईक्तरभाई शेख ,ईस्ताक शेख, शेख फारुख, शेख जहीद आहे अनेक गावांतील नगरिक मोठ्या उत्साहाने उपस्थित होते.

## गौस पाकच्या नावाने महा प्रसाद अन्नदानाच्या सर्व धर्मियांचे लोकांनी घेतला स्वाद




नाशिक ।प्रतिनिधि

ग्यार्वी शरीफ म्हणजे गौस पाकचा महिना मध्ये मुस्लिम समाज अन्नदानाचे आयोजन करतात. या निमित्तांने कादरी नगर, मेहबुब नगर, वडाळा गांवच्या रहवासीयांनी दरवर्षी प्रमाणे या वर्षीही ग्रीन व्हेज पुलाव १२० किलो नियाज ए गौस (महा प्रसाद) च्या आयोजन केले होते, आम दावत असल्याने सर्व धर्मियांनी व परिसरचे लोकांनी गौस पाकच्या महा प्रसादच्या या कार्यक्रमात सहभाग घेतला. या कार्यक्रमला यशस्वी करण्या साठी अहेमद कादरी, खलील शाह, मतिन शाह, सलमान शाह, शाहरुख पठान, भिकन शाह, अलाउद्दीन शेख, शहबाज शेख, लखन मोरे, सादिक शेख, रहिम शेख, सलिम मनियार, माजिद खान या सर्व लोकांनी महा प्रसादात परिश्रम घेतले.

## मंगेश देसाई आणि स्मिता तांबे यांच्या 'गौरीच्या लग्नाला यायचं हं' चित्रपटाचा वर्ल्ड डिजिटल प्रीमियर अल्ट्रा झकास मराठी ओटीटीवर

**मुंबई: मंगेश देसाई आणि स्मिता तांबे यांचा 'गौरीच्या लग्नाला यायचं हं' चित्रपटाचा ४ डिसेंबर २०२३ रोजी अल्ट्रा झकास या मराठी ओटीटीवर 'वर्ल्ड डिजिटल प्रीमियर' होणार आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन पुंडलिक धुमाळ यांनी केले असून स्वतंत्र गोयल यांनी निर्मिती केली आहे.**

**लग्न म्हणलं की घरात सनईच्या आवाजाबरोबर उत्साहाचं वातावरण दाटतं. पण गौरीच्या लग्नाचा विषय काढताच घरात एक गंभीर वातावरण पसरतं. गौरी सर्वगुण संपन्न असली तरी तिच्या काळ्या रंगामुळे तिला लग्नासाठी नवरा मिळणं कठीण झालं आहे. तिची नैराश्य अवस्थाही वाढत चालली आहे, पण तिला समजून घेणारा शाळेतला एक मास्तर तिच्या आयुष्यात आला आहे. गौरी मास्तराच्या प्रेमात पडली आहे खरं, पण मास्तर तिला स्वीकारेल का?**




या चित्रपटाच्या प्रीमियर संदर्भात, 'नाही निर्मळ जीवन, काय करील साबण, तैसे चित्तशुद्ध नाही, तेथे बोध करील काई' हे संत तुकारामांचे बोल आठवतात. माणसाचं सौंदर्य त्याच्या रंगावरून ठरत नसतं, तर मन साफ असावं लागतं, सांगणारा हा चित्रपट सादर करताना अत्यंत आनंद होत आहे. असे अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रा. लिमिटेडचे सी. ई. ओ. श्री. सुशीलकुमार अग्रवाल म्हणाले.

# गंगापूरवर शोककळा!

# कार-कंटेनर अपघातात पाच तरुणांचा जागीच मृत्यू



नाशिक - मनमाड-येवला राज्य महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात पाच तरुणांचा जागीच मृत्यू झाला आहे. कार आणि ट्रकमध्ये झालेली ही टक्कर एवढी भीषण होती की स्विफ्ट कारचा पूर्ण चेंदामेंदा झाला होता.अंकाईयेथील रेल्वे उड्डाणपुलावर हा अपघात झाला. सर्व तरुण हे नाशिकच्या गंगापूरमधील होते. धार्मिक कार्यक्रमाला जातो असे सांगून ते बाहेर पडले होते. पोलिसांनी त्यांचे मृतदेह विच्छेदनासाठी मनमाड उपजिल्हा रुग्णालयात पाठवले.रोहित धनवटे, श्रेयस धनवटे, ललित सोनवणे, गणेश सोनवणे, प्रतीक नाईक अशी मृतांची नावे आहेत. अपघात झाला तेव्हा या भागात अवकाळी पाऊस सुरु होता. यामुळे मदत कार्यातही अडथळे येत होते. महामार्गावर सुमारे तासभर वाहतूक कोंडी झाली होती. क्रेनने दोन्ही गाड्या बाजुला करण्यात आल्या.

# माजलगाव शहर वाहतूक शाखेकडे तीन नवीन जॅमर

## जॅमर करणार ट्रॅफिक आणखी सुरळीत

माजलगाव : प्रतिनिधी

माजलगाव शहर पोलीस वाहतूक शाखेकडे आणखी तीन नवीन जामर मिळाले आहेत यामुळे आता रस्त्यावरच चार चाकी वाहन लावणाऱ्या लोकांची गय केली जाणार नसून त्यांच्याकडून चालू आणि बाकी दोन्ही दंड वसूल करण्यात येणार आहे. तसेच मूळ कागदपत्र पाहिल्याशिवाय त्यांना वाहन परत करण्यात येणार नाही.

थोडीशी मागे किंवा पुढे जागा उपलब्ध असतानाही चार चाकी वाहन चालक ज्या ठिकाणी त्यांचे काम आहे त्याच ठिकाणी रस्त्यातच गाडी उभी करून वाहतुकीस अडथळा तयार करतात. तास तासभर वाहन उभे राहतात त्यामुळे सामान्य लोकांना येण्या जाण्यास अडचण तयार होते यातून बऱ्याचदा ट्रॅफिक जाम होते. यावर शहर पोलिसांनी विलाज काढला असून अशा वाहनांना जामर लावण्यात येणार आहे आणि त्यांच्याकडून पूर्ण दंड वसूल केल्याशिवाय वाहन सोडल्या जाणार नाही याची दक्षता घेणार आहे. सर्वच वाहनधारकांनी वाहन लावताना जास्तीत जास्त



रस्त्याच्या कडेला आणि जिथे जागा उपलब्ध असेल त्या ठिकाणी लावावे. यासाठी थोडे पायी चालायला हरकत नाही. रोडवर वाहन लावू नये तसेच सर्व कागदपत्रे सोबत बाळगावी आणि पोलिसांना सहकार्य करावे असे आवाहन सहाय्यक पोलीस अधीक्षक धीरजकुमार बच्चू, आणि पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांनी केले आहे.

# गेवराई भूषण जीवनगौरव पुरस्काराचे थाटात वितरण

## प्रेरणादायी उपक्रम सातत्याने व्हावेत - डॉ देवकर्ण मदन पाटील

गेवराई/प्रतिनिधी

बीड जिल्हा कलाकारांचा व साहित्यिकांचा बालेकिल्ला म्हटला जातो त्या अनुषंगाने गेवराई शहरही त्याला अपवाद नाही. गेल्या तीन वर्षापासून समाजामध्ये प्रवाहाच्या बाहेर पडलेले जेष्ठ कलावंत व साहित्यिक यांना एकत्र करून त्यांच्या कार्याची दखल घेणारी गेवराईकर मंडळी आहे . त्यांनाही या उपक्रमातून आनंद, प्रेरणा व आत्मविश्वास मिळतो हे काही थोडके नव्हे .यापुढेही त्यांनी हे कार्य चालूच ठेवावे आणि नवीन पिढीला आदर्श घालून द्यावा, असे, प्रतिपादन जेष्ठ लेखक ,समीक्षक, साहित्यिक, संशोधक डॉ. देवकर्ण मदन पाटील यांनी केले . गेवराईतील कलावंतांच्या वतीने दरवर्षी गेवराई भूषण जीवन गौरव पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात येते . यावर्षी १७ नोव्हेंबर २०२३ रोजी कोल्हेर रोडवरील साई सिद्धी सभागृहामध्ये पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते . कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त नगर परिषद मुख्याधिकारी सुदाम धुपे हे होते तर गौरवमूर्ती म्हणून डॉ. प्रकाश चिंचोलीकर, विधीज्ञ मदनलाल इन्दानी , डॉ. देवकर्ण मदन पाटील, प्रकाश दावणगिरे स्वामी यांची उपस्थिती होती . सुरुवातीला कु. स्वरा दुधाळ हिने उपस्थित मान्यवरांचे औक्षण केले . त्यानंतर प्रांजल मनोज टाक, स्वरा दुधाळ यांनी गीत ,नृत्य व भारुड सादर केले.बालकलाकार पद्माकर सरोदे याने संबळ वादन करून वाहवा मिळविली. लोककलावंत कैलास टोणपे याने देवीचा गोंधळ सादर केला . सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले . त्यानंतर अध्यक्ष सुदाम तुपे यांचे स्वागत जेष्ठ कलावंत प्रा. राजेंद्र बरकसे व विधिज्ञ सुभाष निकम यांनी केले. गौरवमूर्तींचा यावेळी सपत्नीक सत्कार गेवराईकर कलावंतांच्या प्रमुख उपस्थितीत ॲड. सुभाष निकम,प्रा.राजेंद्र बरकसे, प्रकाश भुते ,विलास सोनवणे, प्रशांत रुईकर , विष्णूप्रसाद खेत्रे, मुकुंद टाक ,रंजीत सराटे, ,रोहित पुराणिक, दीपक गिरी, विवेक शर्मा, कैलास टोणपे यांच्यासह आणि अध्यक्षांच्या




हस्ते सन्मानचिन्ह, मानपत्र ,भरजरी वस्त्र, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला . मानपत्राचे वाचनही यावेळी करण्यात आले . यावेळी आपल्या सत्काराला उत्तर देताना डॉ. प्रकाश चिंचोलीकर म्हणाले, आज माझे वय ८२ वर्ष आहे . मी आत्ता जरी सक्रिय रंगमंचावर कलावंत म्हणून वावरत नसलो तरी गेवराई शहरात होणाऱ्या प्रत्येक कार्यक्रम व उपक्रमाकडे माझे जातीने लक्ष असते . लहान मुलांसाठी बालनाट्य बसवून त्यांना संधी देणे आवश्यक आहे . जुन्या कलावंतांकडे आदराने पाहण्याचा दृष्टिकोन हा या कार्यक्रमामुळे निश्चितच वाढेल, असेही ते म्हणाले. एडवोकेट एम. एस. इंदानी यांनी गेवराई शहराची राज्य नाट्य स्पर्धेत सहभाग होण्याची परंपरा यापुढेही चालू ठेवून कलावंतांची नवीन पिढी घडवण्याचे कार्य जेष्ठ कलावंतांनी सुरू ठेवावे त्यासाठी आवश्यक ती मदत करण्यासाठी आम्ही तयार आहोत ,असे मत मांडले. तर डॉ. मदन पाटील यांनी भावना व्यक्त करताना गेवराई शहरातील प्रत्येकाशी त्यांची नाळ कशी जुळलेली आहे आणि त्यांच्या जीवनाच्या जडणघडणीत गेवराई शहराचे मोठे योगदान आहे हे त्यांनी पटवून दिले . कुणाशीही स्पर्धा न करता आपण आपलं काम करणे हीच खरी कलावंतांची गरज आहे, असे ते म्हणाले . प्रकाश दावणगिरे यांनी आपल्या जीवनातील घडामोडी सांगितल्या . जीवन गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली . अध्यक्षीय समारोपात सुदाम धुपे यांनी शहरातील सांस्कृतिक कार्यक्रमासाठी साईसिद्धी हॉल सदैव उपलब्ध राहील तसेच शहरात काही उपक्रम करण्यासाठी माझाही सहभाग घ्यावा ,असे त्यांनी सांगितले . कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन विष्णूप्रसाद खेत्रे यांनी तर प्रास्ताविकात ॲड. सुभाष निकम यांनी गेल्या ३ वर्षात कलाकारांच्या वतीने शाहीर रामभाऊ मुळे, हभप उत्तमराव मोटे, प्राचार्य शिवाजी देवढे, विठ्ठलराव वादे, ॲड कमलाकर देशमुख , दि. गो . मुंढे ,श्रीकृष्ण कणपुरे, नागेश माटे यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो आहे ,असे सांगितले . आभार श्रद्धा चिंचोलीकर यांनी मानले . कार्यक्रमास सीता महासाहेब ,ज्योती निकम, रंजना गायसमुद्रे, वंदना हिरे ,ढोलकीसम्राट नितीन प्रधान, अभिनेता जतिन वाघमारे, प्राचार्य राम महासाहेब, निवृत्त मुख्याध्यापक शेषेराव खाजेकर, दिपक महाराज गिरी, मुख्याध्यापक महेश राजूरकर, कल्याण स्वामी, नाभिक समाज कर्मचारी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष उत्तम सोलाने, मंगलनाथ मल्टिपलचे चेअरमन केशव पंडित, रघुनाथ रुचके, पत्रकार मधुकर तौर, उमेश राजूरकर, दिलीप जोशी, अरुण वायचळ, फौजी अरुण परदेशी, विजय जगदाळे, किशोर सोनवणे, शिक्षक नेते बाबुराव नागरगोजे , वैजिनाथ मिटकरी, राजेंद्र डेंगे, डॉ संजय इन्दानी, ॲड. नंदकुमार चिंचोलीकर, निलेश मदन, सुमेध भोले, शेख खाजा, सुरेंद्र रुकर ,सुधाकर सरोदे उपस्थित होते . लोककलावंत स्व . विठ्ठलराव वादे यांना शेवटी श्रध्दांजली वाहण्यात आली .

# बेदरेंच्या समर्थनार्थ गेवराईत प्रचंड रॅली ,सरकार विरुद्ध घोषणाबाजी

## बेदरेंची बदनामी थांबण्याची मागणी

गेवराई : राज्य सरकारसह गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात घोषणाबाजी करत गेवराईमधील मराठा समाजाने ऋषीकेश बेदरे यांच्या अटकेचा तीव्र निषेध करत बेदरे यांच्यावर जाणीवपुर्वक अटकेची कारवाई केल्याचे म्हटले. मराठा योद्धा ऋषीकेश बेदरे व सहकारी यांच्या बेकायदेशीर अटकेचा मराठा समाजाच्या वतीने जाहीर निषेध अशा आशयाचं निवेदन तहसीलदारांसह पोलिसांना देण्यात आलं. हे निवेदन देण्यासाठी शास्त्री चौकातून रमाठा समाजाच्या वतीने मोठी रॅली काढण्यात आली होती.

सराटी अंतरवलीत झालेल्या लाठीमार, दगडफेक प्रकरणी ऋषीकेश बेदरे या मराठा आंदोलकासह अन्य तिघांना पोलिसांनी घटना घडल्यानंतर तब्बल दोन महिन्यांनी अटक केली. याचे पडसाद गेवराईत उमटताना दिसून येत असून मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याचा शब्द दिल्यानंतर पोलिसांनी केलेली कारवाई ही बेकायदेशीर असल्याचे सांगत गेवराईत आज सकाळी मराठा समाज एकवटला. शहरातल्या शास्त्री चौकात मोठ्या प्रमाणावर मराठा समाज जमा होऊन त्यांनी ऋषीकेश बेदरेंच्या अटकेविरोधात रॅली काढली. राज्य सरकारसह गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी या वेळी करण्यात आली. मराठा क्रांती मोर्चाच्या लेटरपॅडवर त्यांनी तहसीलदारांना एक निवेदन दिलं, या निवेदनात पोलिसांनी त्या काळ्या दिवशी मराठा समाज बांधवांवर अमानूष लाठीचार्ज केला. यामध्ये अनेक महिला भगिनी, ज्येष्ठ नागरीक आणि मराठा समाज बांधव पोलिसांकडून चिरडले गेले. ऋषीकेश बेदरेंसह



अनेक मराठा समाजातील तरुणांवर खोटे गुन्हे दाखल केले. तब्बल सत्तर दिवसांनी झोपलेल्या पोलीस प्रशासनाला जाग आली आणि त्यांनी बेदरे यांना अटक केली. मराठा आंदोलन चिरडण्यासाठीच पोलिसांचं हे षडयंत्र असल्याचे त्यांनी निवेदनात म्हटले आहे. ऋषीकेश बेदरे व त्यांच्या सहकार्यांना केलेली अटक ही बेकायदेशीर असून त्यांच्या पाठिशी मराठा समाज खंबीरपणे उभा आहे. अटक केल्यानंतर त्यांची सुरू असलेली बदनामी तात्काळ थांबवावी, असेही निवेदनात म्हटले आहे. सदरचे निवेदन हे तहसीलदार, पोलीस प्रशासन यांना देण्यात आले असून त्याच्या प्रत मुख्यमंत्र्यांसह गृहमंत्र्यांना पाठविण्यात आल्या आहेत.

# ग्रामपंचायतला वैयक्तीक खाते जोडून अपहार केला

**शिरुर तालुक्यातील प्रकार, सिईओकडे तक्रार**



बीड /प्रतिनिधी

ग्रामपंचायतला वैयक्तीक खाते जोडून सिंचन विहरीचे पैसे उचल्याचा प्रकार समोर आला आहे. सदरील ही बाब लक्षात आल्यानंतर या प्रकरणी जिल्हा परिषदेच्या सिईओकडे तक्रार करण्यात आली. दोषी विरोधात कारवाई करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.शिरुर तालुक्यातील मानूर येथे एकाने स्वतःच्या नावाने एक वेंडर तयार करुन त्याला वैयक्तीक खाते जोडण्यात आले. गेल्या तिन ते चार वर्षामध्ये अनेक जलसिंचन विहरी व सार्वजनीक कामाचे पैसे त्या वैयक्तीक खात्यात जमा केले. महत्वाची बाब म्हणजे ज्या लाभार्थ्यांच्या जलसिंचन विहरीचे पैसे ज्या खात्यावर पडले त्या लाभार्थ्यांना अद्याप पैसे मिळाले नाही. हे वैयक्तीक खाते ग्रामपंचायतच्या वेंडरला अॅड कसे झाले याची चौकशी करुन कारवाई करण्यात यावी अशी मागणी मानूर ग्रामपंचायतचे सरपंच अशोक पाखरे यांनी जि.प.चे सिईओ यांच्याकडे केली आहे.

# चाळीसगाव शहराची बत्ती गुल,विधुत पुरवठा कायम सुरळीत करण्यासाठी महावितरणचे अधीकारी उदासीन

चाळीसगाव शहरात पावसामुळे साचले रस्त्यावर पाणी.विजेचा लपंडाव सुरूच

चाळीसगाव शहरात महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरणच्या गलथान कारभारामुळे चाळीसगाव शहरातील नागरिकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे.आज चाळीसगाव शहरात लहान मोठे उद्योग धंदे करून नागरिक व छोटे मोठे व्यवसायिक हे आपले व आपल्या कुटुंबाचे पोट भरण्यासाठी दिवसरात्र काम करत असतात.यातील बरेच व्यवसाय हे लाईट वर अवलंबून आहेत.ज्यावेळी लोकांना व्यवसाय,काम,करणेसाठी लाईट ची गरज असते नेमक त्याच वेळी विधुत पुरवठा बंद केलेला असतो,त्यामुळे शहरातील नागरिकांचे मोठे नुकसान होत आहे.चालू असलेले काम बंद पडते,लाईट चा पुरवठा सुरळीत करणेसाठी महावितरणचे अधिकारी व कर्मचारी हे लक्ष देईला तयार नाहीत.पावसामुळे ही चाळीसगाव शहरातील लाईट दुपारी ५ वाजेपासुन गेली ती रात्री ९ वाजेपर्यंत आली नाही.त्यात भर दिवसाही चाळीसगाव शहरामधील लाईट कधी चालू तर कधी बंद चालू असते.काही ठिकाणी लाईट च्या पोलवरील विधुत तारा खाली लोबंकळत आहेत त्याचे कडेही या संबधीत अधिकारी व कर्मचारी यांचे लक्ष नाही.चाळीसगाव शहरातील लाईटची बत्ती कधीही गुल होत असल्यामुळे लोकांचे कामे खोळबंत आहेत.

# काल्याचे किर्तन तर महाप्रसादाचे आयोजन


बीड ।प्रतिनिधी

येथील श्रीसंत जनीजनार्दन स्वामी महाराज थोरले पाटंगण संस्थान यांच्या ४२३ व्या प्रतिवार्षिक महोत्सवानिमित्त आज मंगळवार दि. २८ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी ठीक नऊ वाजता आचार्य श्री अमृताश्रमस्वामी महाराज (श्री अमृत महाराज जोशी,नवगण राजुरीकर) यांचे काल्याचे किर्तन संपन्न होणार असून दुपारी एक ते पाच महाप्रसाद होणार आहे. बीड शहरातील महिला, पुरुष भाविकभक्तांनी महाप्रसादास सहपरिवार उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन थोरले पाटंगण संस्थान, पाटंगण गल्ली बीड, पाटंगणकर परिवार यांच्या वतीने करण्यात आले आहे तर बुधवार दिनांक २९ नोव्हेबर रोजी सकाळी सहा वाजता मठाधिपती विनायक धुंडिराज महाराज यांचे लळीताचे कीर्तन संपन्न होणार असून संस्थानच्या महोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सर्वच कार्यक्रमाचा महिला,पुरुष भाविकभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन संस्थानच्या वतीने मठाधिपती श्री. विनायक धुंडीराजशास्त्री पाटंगणकर यांनी केले आहे.



# मकरंद अनासपुरेंच्या ‘छापा काटा’ चित्रपटाचा ट्रेलर संपूर्ण महाराष्ट्रात घालतोय धुमाकूळ!!

मुंबई: अभिनेते मकरंद अनासपूरे आणि तेजस्विनी लोणारी यांची जोडी असणारा ‘अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रायव्हेट लिमिटेड’ प्रस्तुत ‘छापा काटा’ चित्रपटाचा नुकताच पोस्टर लाँच होऊन प्रेक्षकांमध्ये कमालीचा उत्साह पहायला मिळाला होता. चित्रपटाच्या विलक्षण पोस्टरनंतर २४ नोव्हेंबर २०२३ रोजी प्रत्येकाचं चित्त वेधून घेणारा ‘छापा काटा’ चित्रपटाचा ट्रेलर लाँच झाला असून ट्रेलर संपूर्ण महाराष्ट्रात जोरदार धमाका उडवत आहे.




‘छापा काटा’ चित्रपट १५ डिसेंबर २०२३ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाची निर्मिती श्री. सुशीलकुमार अग्रवाल यांनी केली असून पटकथा आणि दिग्दर्शन संदीप मनोहर नवरे यांनी केली आहे. छायाचित्रण गौरव पोंक्षे, बिजनेस हेड (अल्ट्रा डिजिटल स्टुडिओ) अरविंद अग्रवाल, संकलक मीनल राकेश म्हादनाक, कार्यकारी निर्माता दर्शन चोथाणी, बिजनेस हेड (अल्ट्रा मराठी) श्याम मळेकर, क्रिएटिव्ह निर्माता रजत अग्रवाल आणि सोशल मिडिया अँड डिजिटल मार्केटिंग ब्रिन्दा अग्रवाल आहेत.ट्रेलरमध्ये करामती नाम्या एका श्रीमंत मुलीशी लग्नाचा करार करून धमाल विनोदी गोंधळ घालताना दिसत आहे. नाम्या म्हणजेच मकरंद अनासपूरे आणि श्रीमंत मुलगी अभिनेत्री तेजस्विनी लोणारी असून मोहन जोशी, अरुण नलावडे, ऋतुराज फडके, पंकज विष्णु, सुश्रृत मंकणी, रीना अग्रवाल आणि विजय पाटकर या सुप्रसिद्ध अभिनेत्यांच्या विनोदाचा डबल धमाल चित्रपटात पहायला मिळणार आहे.

तूर्तास पोस्टर आणि धमाकेदार ट्रेलर बरोबरच प्रत्येक रसिकाच्या मनाला प्रेमाचा ओलावा देणारं चित्रपटातील ‘कुणी समजवा माझ्या मनाला’ गाणं प्रदर्शित झाले असून गाण्याला संपूर्ण महाराष्ट्रातून भरमसाठ प्रतिसाद येत आहे. गाण्याला अभय जोधपुरकर आणि आर्या आंबेकर यांनी आपले स्वर दिले असून गौरव चाटी, गणेश सुर्वे आणि मुकुल काशीकर यांनी संगीतबद्ध केले आहे.महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यात असणाऱ्या प्रत्येक रसिकाला त्याच्या आवडीचं मनोरंजन अनुभवता यावं यासाठी आम्ही ‘छापा काटा’ सारखा संपूर्ण धमाल विनोदी मनोरंजन असणारा चित्रपट महाराष्ट्रभर प्रदर्शित करत आहोत. नुकताच प्रदर्शित झालेला ट्रेलर आणि गाण्याला प्रेक्षकांचा प्रतिसाद पाहून चित्रपटालाही जोरदार प्रतिसाद असणार यात शंका नाही. असे अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रा.लिमिटेडचे सी.ई.ओ. श्री सुशीलकुमार अग्रवाल म्हणाले.



# पिंपरी राजा येथे विश्वशांतीसाठी दुआने इज्तेमाचा समारोप

सर्व राजकीय पुढाऱ्यांची इस्तेमात हजरी

संदीप शिंदे - पिंपरी राजा येथे दगडगाव मजीद परिसरात आयोजित दि २४ व २५ दोन दिवशी तालुकास्तरीय तबलगी उमुमी इस्तेमाची दिनांक २५ रविवार रोजी संध्याकाळी नमाज ए मगरीब ते नमाज ए ईशा दरम्यान उमामी बात झाल्यानंतर शेकडो मुस्लिम बांधवांच्या हजरीत महाराष्ट्र राज्याचे मौलाना साहब यांच्या दुवाने समारोप झाला दिनांक २४ व २५ दोन दिवस इस्तेमात नमाजे फजर जोहर असर मगरीब इषा दरम्यान दिन दुनिया इमान नमाज इल्म जिक्र इक्रास इकलास दावत हज जन्नत दोजक बरोबर अल्लाह हजरत आदम अले सलाम ते नवी हुजूर मोहम्मद सलालोहा सलीम इतर नबी सहावा यांचे कार्य दैनंदिन जीवन त्यांनी घेतलेला त्रास दिन ला घेऊन केलेले कार्य बलिदान केलेले दान नवी यांच्यासाठी सांगितलेल्या कार्याबद्दल दिलेली दावत व त्यासाठी घेतलेली मेहनत आधी यावर दोन दिवस अनेक मौलानाने सविस्तर मार्गदर्शन केले तर आई-वडील, शेजारी, लहान, मोठे, गाव, देश, यासंदर्भात सर्वांनी मान सन्मान करण्यासंदर्भात मार्गदर्शन केले अल्लाह व नबी उसास यांनी सांगितलेली कुराण हदीस वर चालून आपली दिनाचार्य सतत सलग ठेवून मृत्यू पर्यंत कार्य करण्याची व ती शिकण्यासाठी वर्ष, चार महिने, चाळीस दिवस, तीन दिवस ,घर ,कुटुंब, सोडून शिकवणी घेऊन पुन्हा घरी येऊन मजिदमध्ये पाचटाईम काम करण्यावर भर देत या कार्यासाठी इस्तेमाचे आयोजन होते सर्व मौलानांनी सविस्तर मार्गदर्शन करून इस्तीमाचे दुवा ने समारोप झाले इस्तेमासाठी येणाऱ्या साठी पिंपरी राजा परिसरातील बांधवांनी सेवा केली इस्तिमात येणाऱ्या भाविकासाठी स्वच्छता पाणी स्वच्छालय आंघोळीची, व्यवस्था दवाखाना, जेवण, बिछायत, लाईट, स्पीकर व्यवस्था, बाजार व्यवस्था, पार्किंग व्यवस्था, विविध व्यवस्थेचे नियोजनबद्ध नियोजन परिसरातील मुस्लिम साथिने बांधवांनी करून आलेल्या बांधवांचे मने जिंकून घेतली पिंपरी राजा परिसरात तबलगी उमुमी इस्तेमा प्रथमच झाल्याने मोठी उत्सुकता पाहण्यास मिळाली

# अवकाळी तडाखा

मुंबई : अवकाळीच्या संकटामुळे शेतकऱ्यांच्या अश्रूंचा बांध पुन्हा फुटला आहे. पुन्हा एकदा अवकाळीनं अनेक भागांत अवकृपा केली आहे. रात्री झालेल्या पावसामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांमधील पिके जमीनदोस्त झाली. पुणे, अहमदनगर, नंदुरबार, वाशिम, नाशिक, नांदेड जिल्ह्यात अवकाळी पावसामुळं मोठं नुकसान केलं आहे. दरम्यान, पुण्यातल्या आंबेगावात गारपिटीचा जोरदार तडाखा बसला आहे. कांदा आणि बटाटा पिकांचं मोठं नुकसान झाले आहे. तर निफाडमध्येही गारपिटीनं झोडपलं, द्राक्ष पिकांना मोठा फटका बसला आहे. हवामान विभागानं दिलेल्या अंदाजानुसार आजही राज्यात अवकाळी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. आज राज्यात अनेक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज आहे.


हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार हिंगोली जिल्ह्यांमध्ये रात्री जोरदार स्वरूपाचा अवकाळी पाऊस बसला आहे ढगाच्या सह बरसलेल्या पावसामुळे शेतातील कापसाच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे हिंगोली जिल्ह्यांमध्ये कापूस उत्पादक शेतकरी या रात्रीच्या पावसामुळे चांगले संकटात सापडले आहेत कारण व्यसनीला आलेला कापूस या पावसामुळे पूर्णपणे भिजला आहे सुरुवातीपासूनच पाऊस काळ कमी कमी होता पावसाने मारलेली दडी या परिस्थितीत शेतकऱ्यांनी कापसाचे पीक जोपासली होती परंतु रात्री झालेल्या पावसाने शेतकऱ्याच्या हातात तोंडाशी आलेला घास हिरावला आहे,

हिंगोलीत कापसाला मोठा फटका

हिंगोली जिल्ह्यांमध्ये रात्री जोरदार स्वरूपाचा अवकाळी पाऊस बसला आहे. शेतातील कापसाच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. हिंगोली जिल्ह्यांमध्ये कापूस उत्पादक शेतकरी या रात्रीच्या पावसामुळे चांगले संकटात सापडले आहेत. कारण वेचणीला आलेला कापूस या पावसामुळे पूर्णपणे भिजला आहे.

वादळी वाऱ्यासह गारांच्या पावसाने पारनेरला झोडपले

अहमदनगर जिल्ह्याला काल अवकाळी पावसाने झोडपले आहे. वादळी वाऱ्यासह गारांच्या पावसाचा पारनेर तालुक्याला सर्वाधिक फटका बसला आहे. पारनेर तालुक्यात कांदा, टोमॅटो, मका, ज्वारी तसेच फळबागांना फटका बसला आहे. पारनेरच्या पानोली, जवळा, निघोज या गावांमध्ये गारांचा मोठा फटका बसला आहे. यामध्ये शेतकऱ्यांचे झालेल्या नुकसानीचे पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार निलेश लंके यांच्यानी सकाळी पाहणी केली.दरम्यान शासनाने तातडीने या नुकसानीची पाहणी करून पंचनामे करावेत अशी मागणी केली.



## २० ते २५ हजार क्विंटल मिरची पाण्यात

आवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका नंदुरबारमधील मिरची खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांना बसला आहे. शेतकऱ्याकडून खरेदी केलेली जवळपास २० ते २५ हजार क्विंटल मिरची पाण्यात भिजल्याने खराब होण्याची शक्यता आहे. पावसात भिजल्याने ३० टक्के मिरची खराब होण्याचा अंदाज आहे. दोन ते तीन कोटी रुपयाचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

## पुण्यात आंबेगाव तालुक्यातील बहुतांश गावात गारपिटीचा तडाखा

पुण्यातील उत्तर भागात काल अवकाळी पावसाने चांगलेच झोडपून काढले. आंबेगाव तालुक्यातील बहुतांश गावात गारपिटीचा तडाखा बसलाय. कालची गारपीटीची दृश्य आता समोर आलेली आहे. लोणी, धामणी, खडकवाडी गावातील शेतकऱ्यांच्या कांदा रोपांचे नुकसान झालंय. तर काही भागात बटाटा पिकाला काही प्रमाणात फटका बसलाय.

## कांद्याचे मोठे नुकसान

उन्हाळा कांदा संपून आता लाल कांदा बाजारात यायला सुरुवात झालेली असतांना आज अवकाळी पाऊस व गारपिटीने पुन्हा एकदा चांगलेच झोडपल्याने कांद्याचे मोठे नुकसान झाले आहे. गेल्या तीन महिन्यापासून दुष्काळाची परिस्थिती असतांना कांद्याची लागवड करून वाढवण्यात आला होती.

शेतातून कांदे काढायचे अन् बाजारात विकायचे अशी परिस्थिती असतांना अवकाळी पाऊस व गारपिटीने आज शेतकऱ्याचा कांद्यावर घाला घातला.या गारपिटीमुळे शेतातील कांदा सडून शेतकऱ्याच्या हाती काहीच शिल्लक राहणार नाही.त्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी हतबल झाला आहे. दरम्यान, गारपिटीमुळे लाल कांद्याचे उत्पादन कमी होऊन भविष्यात पुन्हा ’ कांदा ’ टंचाई निर्माण होणार आहे.

# बार्शी रोडवरील मंगल कार्यालये, हॉटेल, दुकानांमुळे वाहतूक कोंडी

## रुग्णवाहिकाही अडकली पोलिसानी कारवाई करावी

बीड । प्रतिनिधी

शहरातील बार्शी रोड हा मुख्य रस्ता असून परळी, सोलापूर तसेच जवळपासच्या खेड्यातून नागरिक ये जा करत असतात. त्यामुळे या रस्त्यावर सतत रहदारी असते, बाशी नाका चौकात तर सतत वाहतूक कोंडी असते. बाशीं नाक्यावरील हॉल, लॉन्स सह या रस्त्यातील इतर मंगल कार्यालय मध्ये लग्न व इतर कार्यक्रम असतात तें वाहनाला पार्किंग सुविधा नसल्याने वाहतूक कोंडी होते. ते मंगल कार्यालय वाले एक ते दिड लाख रुपये घेतात पण पार्किंग सुविधा देत नसल्याने याचा त्रास नाहक सर्वसामान्य नागरिकांना होत आहे. सोमवारी सायंकाळी ७ च्या सुमारास या रोडवर मोठी चूंफिक झाली होती. वाहनांच्या लांबच्या लांब रांगा लागल्या होत्या. त्यात रुग्णवाहिका देखील बऱ्याच वेळ अडकल्या होत्या. शेवटी ट्रॉफिक वाढत असल्याने रुग्णवाहिकेला रस्ता बदलावा लागला. बाशीं नाका पेट्रोल पंप रस्त्यावर वाहने उभी असतात वाहतूक पोलीस मात्र दुर्लक्ष करत आहेत. या आधी रस्त्यावर नो पार्किंग मध्ये वाहन असेल तर जैमर लावत होते पण आत्ता तसे दिसत नाही. रस्त्या लगत काही अनधिकृत शेड, टपऱ्याने अतिक्रमण केल्याने सतत वाहतूक कोंडी होत असून अपघात होण्याची शक्यता आहे. बार्शी रोड ला सोमेश्वर मंदिर, भगवान बाबा मंदिर असल्याने भाविक भक्त दर्शनाला जात असतात. याचशक्यता आहे. या गॅरेज चालकाला, शेड धारकाला, वाहन खरेदी विक्री करणाऱ्याना आणेक वेळा सांगून देखील हे जाणीवपूर्वक गाड्या व दुकानच्या नावाच्या पाट्या रस्त्यावर ठेवतात. नगरपालिकाचे अधिकारी यांनी याआधी पण यांचे अतिक्रमण काढले होते परंतु ते काही दिवसात पुन्हा जशास तसेच करतात. या गॅरेज, हॉटेल, दुकानदारानि गाड्या, पाट्या रस्त्यापासून नाही पाहिजे. पुढे मुक्ता लॉन्स, शिवराज चौक, बीड शासकीय दवाखान्यापुढे पण वाहने, रिक्षा अशीच अस्ताव्यस्त लावलेली असतात. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याच्या

अनधिकृत शेड, टपऱ्या काढण्यात याव्या व रस्ता खुला करावा अशी मागणी सामान्य नागरिकांतून होत आहे. बार्शी रोडवरील एका मंगल कार्यालयात लग्न सोहळा असल्याचे दोन तास वाहतूक कोंडी झाली



यामुळे सर्वसामान्य नारिकांना याचा त्रास सहन करावा लागला. बाशी रोडवरील सर्वच मंगळकर्यालय, हॉटेल पर्किंग सुविधा नसलेल्या चालकास नोटीस देऊन कारवाई करावी, रुबी फंक्शन हॉल, गॅलेक्सी लॉन्स, आशीर्वाद लॉन्स, अमन लॉन्स व काही हॉटेल कारवाई करावी करतील का ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.मुख्यधिकारी यांनी अनधिकृत रोडवर कारवाई करून दंड वसूल करावा, बार्शी रोड वरील

बाजूचे देखील अतिक्रमण काढण्यात यावे व बेशिस्त वाहन धारकाला दंड करून शिस्त लावावी. वस स्थनका समोर तर नो पार्किंग मध्येच वाहने भरली जातात त्याकडे वाहतूक पोलीस व संबधीत पोलीस ठाणे दुर्लक्ष करतात. दोनशे मीटर मध्ये खाजगी वाहन लावन्यास बंदी आहे पण हा नियम फक्त नावालाच आहे असे दिसून येत आहे. साठे चौकात तर रिक्षा मुळे वाहतूक कोंडी होतेच पण हॉटेल समोरील पार्किंग सुविधा नसल्याने

दुचाकी, चारचाकी वाहन रस्त्यावर पार्किंग करतात त्यामुळे वाहतूक कोंडी तर होतेच पण अपघात देखील झाले आहेत. त्यामुळे प्रशासनाने व नगरपालिकारस्त्या जवळ श्री. संत इंग्लिश स्कूल असून विध्यार्थी व त्याना शाळेत सोडणार पालक, महिलांना अनेक अडथळ्याचा सामान करावा लागत आहे. तसेच या रस्त्यावर तिडके, रेणू हॉस्पिटल आहे त्यामुळे रुग्ण उपचारासाठी येत असतात. या रस्त्यावर सतत रहदारी असते. गॅरेजवाले रस्त्या लगत मोटरसायकल व

रिक्षे लावल्याने नाविलाजास्तव येणाऱ्या जाणाऱ्याला या रस्त्यावरूनच चालवे लागते त्यामुळे अपघात होण्याची रस्त्यालगतचे अनधिकृत शेड, टपऱ्या, न. प.ने काढाव्यात यामध्ये असे अनेक रस्ते आहेत की त्या रस्त्यामध्ये अतिक्रमण धारक यांनी अक्षरशः ५० टक्के रस्ता अतिक्रमण करत आपल्या ताब्यात केला आहे यामध्ये काही बीड शहरातील मंगल कार्यालय काही राजकीय नेत्यांच्या बिल्डिंग काहींचे हॉटेल पार्किंग तसेच वेगवेगळे व्यवसाय आहेत यामध्ये हॉस्पिटल असतील किंवा मंगल कार्यालय असतील वेगवेगळ्या बिल्डिंग यांनी अतिक्रमण करत बीड मधील रस्त्यावरती एक प्रकारे मालकी हक्कासारखा ताबा केला आहे

# नांदर/दावरवाडी परिसरातील अवैध धंदे बंद करा

## छावा क्रांतिवीर सेना करणार आंदोलन

पैठण । प्रतिनिधी

**नांदर/दावरवाडी परिसरात अवैध धंदे यांनी थैमान घातले आहे. अवैध वाळू उपसा व वाहतुक, अवैध दारू विक्री (देशी, विदेशी, हातभट्टी खुलेआम विक्री करत आहे. नांदर मधील बाजारतळातील मोकळ्या जागेत अवैध दारू विक्री मोठ्या प्रमाणात होत असुन अवैधरित्या थाटलेल्या या दुकानाच्या आसपास तळीरामांची गर्दी असते. कित्येकवेळा तळीरामाच्या त्रासाला अनेक महिलांना सामोरे जावे लागले आहे.**

तात्पुरता आडोसा तयार करून या ठिकाणी अड्डे सुरु करण्यात आले आहेत. त्यामुळे येथील व्यापारी वर्ग, खरेदीसाठी येणारे ग्राहक, महिला यासर्व बाबींनी त्रस्त झाले आहेत. तरुण वर्ग यामुळे दारूच्या आहारी गेला त्यामूळे अनेकांचे संसार उघड्यावर पडले आहे. अनेक वेळा दारु मुळे गावात वादावादी झाल्या आहेत. त्यामुळे अवैध दारू व्यावसायिकांवर कारवाई करण्यात यावी, याबरोबर नांदर-दाववाडी येथील विरभद्रानदी पात्रातून बेसुमार अवैध वाळू उपसा होत आहे. रात्री-अपरात्री भरधाव वेगाने जाणारे वाळूचे ट्रैक्टर मुळे दहशतीचे वातावरण बनले आहे. एकीकडे वाळू लिलाव प्रक्रियास समस्त नांदर गावकरी विरोध करत आहे कारण वाळू उपसा यामुळे पाणीपातळी खोल जाते,शेतीसाठी पाणी पुरेसे प्रमाणात राहत नाही. परंतु अवैध वाळू उपसा करणारे आडदांड व त्यांच्या दहशतीने कोणी पुढे येण्यास तयार नाही. त्यामूळे छावा क्रांतिवीर सेना संघटनेमार्फत नांदर/दावखाडी येथे अवैध धंदयावर कारवाई करावी यासाठी दि. ३०/११/२०२३ गुरुवार रोजी नांदर ग्रामपंचायत कार्यालयासमोर एकदिवसीय लाक्षणिक उपोषण आंदोलन करण्यात येणार आहे असे आशयाचे निवेदन पोलिस उपनिरीक्षक माळी साहेब पाचोड यांना देण्यात आले आहे.

यावेळी उपस्थित प्रदेश सरचिटणीस अनिल राऊत,मराठवाडा अध्यक्ष रामेश्वर बावणे, जिल्हाप्रमुख भागवत भुमरे, विशाल काळे, कृष्णा काळे आदी उपस्थित होते.

# अहमदनगरमध्ये रस्त्यांच्या कामात करोडोंचा भ्रष्टाचार

## काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे यांनी दिली 'अँटी करप्शन'कडे फिर्याद

अहमदनगर । प्रतिनिधी

नगर शहरातल्या रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट आहे. राजकीय वरदहस्त आणि मनपा अधिकारी, ठेकेदारांच्या संगनमताने झालेला कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार, शासकीय निधीचा अपहार जबाबदार झाला आहे, असा गंभीर आरोप अहमदनगर शहर काँग्रेस जिल्हाध्यक्ष किरण काळे यांनी केला आहे.

अहमदनगर शहर आणि परिसरातल्या ७७६ रस्त्यांच्या कामात नगर शासकीय तंत्रनिकेतनच्या नावे कामांचे गुणवत्ता टेस्ट रिपोर्ट, थर्ड पार्टी रिपोर्ट तयार करण्यासाठी तंत्रनिकेतन, राजपत्रित अधिकारी यांच्या नावे बनावट शिक्के, लेटरहेड तयार करून रस्त्यांच्या कामात कोट्यावधी रुपयांचा घोटाळा करत भ्रष्टाचार केल्याप्रकरणी अँटी करप्शनचे राज्याचे अप्पर पोलीस महासंचालक विश्वास नांगरे पाटील व नाशिक परिक्षेत्राच्या पोलीस अधीक्षक शर्मिष्ठा घारगे - वालावलकर यांच्याकडे काळे यांनी ऑनलाईन फिर्याद दाखल केली आहे. १ डिसेंबरला ते अँटी करप्शनचे राज्याचे अप्पर पोलीस महासंचालक विश्वास नांगरे पाटील यांची मुंबईत भेट घेणार आहेत.

निकृष्ट कामे करणारे बहुतांशी ठेकेदार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते असल्याचा गंभीर आरोपही काळेंनी केला आहे. काळे यांनी काँग्रेसच्या शिवनेरी संपर्क कार्यालयात आयोजित पत्रकार परिषद बोलवली होती. यावेळी त्यांनी पुराव्यांची शेकडो कागदपत्रं पत्रकारांना दाखवली.काळेंनी त्यांच्या फिर्यादीत अहमदनगर महापालिकेचे सध्याचे आयुक्त डॉ. पंकज जावळे यांच्यासह सन २०१६ ते २०२३ मधील ८ आयुक्त, शहर अभियंता मनोज पारखे, अभियंता श्रीकांत निंबाळकर, सेवानिवृत्त शहर अभियंता सुरेश इथापे यांच्यासह ६ शहर अभियंते, बांधकाम विभागाचा चार्ज असणारे सात वर्षांतले सर्व उपायुक्त, बांधकाम, लेखा विभागातील कर्मचारी, ठेकेदार, त्यांच्या संस्थांचे प्रोप्रायटर, भागीदार, ऑडिटर, शासकीय तंत्रनिकेतन, अहमदनगर तसेच ज्या, ज्या शासकीय, निमशासकीय संस्था यांनी बनावट गुणवत्ता चाचणी अहवाल दिले, त्या प्रक्रियेशी निगडित सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी यांच्याविरुद्ध सामूहिक संगनमत करत कट कारस्थान रचून रस्त्यांच्या कामात शासन आणि जनतेची फसवणूक करत भ्रष्टाचार केल्याची फिर्याद दिली आहे.

निकृष्ट दर्जाची कामे करून नगर शहराला खड्ड्यात घालणाऱ्या दोषींवर लाच लुचपत प्रतिबंधक कायदा कलम ७ आणि १३ तसेच भारतीय दंड संहिता कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, ४६६, १२० ब, १९६, २०१, २०२, २०४, ४७५, ४७६, ४७७ अ, ३४ अन्वये जनहितार्थ अति जलद फौजदारी गुन्हा दाखल करावा, असे काळे यांनी फिर्यादीत म्हटले आहे. फसवणूक करणे, अपहार, भ्रष्टाचार करणे, बनावट दस्तऐवज तयार करणे, पुरावे नष्ट करणे, उपकरणांचा उपयोग करून खोटे शिक्के तयार केल्या बद्दल सात ते दहा वर्षांपर्यंतची शिक्षा असणारे दखलपात्र गंभीर स्वरूपाचे गुन्हे नोंदवावेत.

भ्रष्टाचारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या जंगम, स्थावर मालमत्तेची चौकशी करावी. अपहारातील सहभागींची खुली चौकशी व्हावी. गैरमार्गाने मिळवलेल्या बेहिशोबी संपत्तीचा शोध घेऊन ती तात्काळ जप्त करावी. अशी तक्रारही काळेंनी केली आहे.काळेंच्या तक्रार आणि शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयासमोर करण्यात आलेल्या आंदोलनानंतर प्राचार्यांनी १६ जूनला आदेश काढत २०१६ ते २०२० कालावधीतील अहवालांची सत्यासत्यता पडताळणी करणेकामी पाच जणांची चौकशी समिती गठित केली होती. यामध्ये स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या विभाग प्रमुखांना समिती प्रमुख करत विद्युत, यंत्र अभियांत्रिकी विभाग, प्रबंधक यांचा समावेश होता.या समितीने अहवाल सादर केला आहे. सदरहू चौकशी अहवालामध्ये अहमदनगर मनपाकडून प्राप्त ८७९ चाचणी अहवाल व त्रस्त चाचणी अहवालांपैकी ७२५ चाचणी व ५१ त्रयस्थ परीक्षण अहवाल असे एकूण ७७६ अहवाल शासकीय तंत्रनिकेतन संस्थेतून देण्यातच आलेले नसल्याची धक्कादायक बाब पुराव्यानिशी निष्पन्न झाली असल्याचे काळेंनी म्हटले आहे.

राजकीय नेतृत्व जबाबदार: -मनपाच्या बांधकाम, पाणी पुरवठा, विद्युत, कचरा संकलन अशा विविध विभागांच्या कामांमध्ये कोट्यवधींचा भ्रष्टाचार आहे. अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून काम करुन घेण्याची जबाबदारी शहर लोकप्रतिनिधी, नगरसेवकांची आहे. मात्र आपल्या बेरोजगार कार्यकर्त्यांना पोसण्यासाठी त्यांच्या नावाने टेंडर मॅनेज करून दिले जातात. तीस ते शंभर टक्क्यांपर्यंत टक्केवारी घेतली जाते.

निकृष्ट कामे कागदोपत्री जिरविण्यासाठी बनावट दस्तऐवज तयार केले जातात. बिलं लाटली जातात. या टक्केवारीतून कमावलेला पैसा विधानसभा, मनपा निवडणूकीत मतदारांना वाटण्यासाठी राजकीय नेतृत्व वापरते. रस्त्यांच्या दुरावस्थेला राजकीय नेतृत्व जबाबदार असून मतदारांनी आपण नेमके कुणाला निवडून देत आहोत, याचा अंतर्मुख होत विचार करण्याची गरज असल्याचे मत काळे यांनी यावेळी व्यक्त केले.

'त्यांना' तुरुंगात घातल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही:-काँग्रेसने शहरातील रस्त्यांच्या प्रश्नावरून अनेक निवेदनं दिली असून आंदोलनं केली. मुंबईच्या आझाद मैदानावर खड्ड्यांचे प्रदर्शन भरवले. आत्मदहनाचा इशारा दिला. मनपावर आसूड मोर्चा काढला. त्यावेळी माझ्यासह काँग्रेस कार्यकर्त्यांवर भ्रष्टाचार दडपण्यासाठी राजकीय दबावातून खोटे गुन्हे दाखल केले गेले. रस्त्याचा मलिदा खाणारे चोर मोकाट फिरत आहेत.

# पुढा-यांची त-हा न्यारी म्हणे शासन आपल्या दारी, दुष्काळी परिस्थितीत कोट्यवधींचा चुराडा:- डॉ.गणेश ढवळे

बीड:- बीड जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती असताना त्यातच अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झालेले असताना, बीड जिल्ह्यात गेल्या ११ महिन्यात २३५ शेतकरी आत्महत्या झालेल्या असताना ज्ञानमंदिरांना अवकळा आलेली असताना त्यांना निधी देताना हात आखडता घेणारे सरकार शासन आपल्या दारी सारख्या कार्यक्रमांवर जाहिरात, बॅनर बाजी करत ५ कोटी पेक्षा जास्तीचा जनतेच्या पैशाचा चुराडा करत असुन जिल्ह्यातील संपादकांची भुसंपादनाची जाहिरातीची देयके अदा करण्यात यावीत यासाठी वारंवार जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दारात गेल्या ३ वर्षांपासून धरणे आंदोलने करणा-या संपादकांच्या मागणीकडे शासन दुर्लक्ष करत असुन केवळ आश्वासने देऊन टोलवाटोलवी करत असुन शासन आपल्या दारी कार्यक्रम म्हणजे जनसामान्यांची थट्टा असुन यांच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२८ मंगळवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री बीड यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात




शहरप्रमुख शेख युनुस, मिलिंद सरपते, शेख मुबीन, सुदाम तांदळे, शेख मुस्ताक,शिवशर्मा शेलार, संजय पावले सहभागी होते.

मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत होणारा शासन आपल्या दारी हा कार्यक्रम बीड जिल्ह्याच्या ठिकाणी घेणे अपेक्षित असताना पालकमंत्री बीड धनंजयजी मुंडे यांनी तो परळी याठिकाणी घेण्याचा घातलेला घाट यामुळे ईतर तालुक्यातील लोकांची गैरसोय हा त्यांचा मनमानी कारभाराचे प्रतिक असुन आम्ही बीडकर यांचा निषेध करत आहोत.

मागील वर्षी मराठवाड्यातील सर्वाधिक आत्महत्येची नोंद बीड जिल्ह्याच्या नावावर होती.बीड जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढत असुन सन २०२३ मध्ये मागच्या ११ महिन्यात तब्बल २३५ शेतकऱ्यांनी आपले जीवन कर्जबाजारी,नापिकी, दुष्काळ आणि आर्थिक विवंचनेतून संपवल्याची शासन दरबारी नोंद आहे.जानेवारी २२, फेब्रुवारी २५,मार्च १८, एप्रिल १६,मे १७,जुन ३०, जुलै २७, आगस्ट ३१, सप्टेंबर २५, आक्टोबर १२, नोव्हेंबर १२ ( १७ नोव्हेंबर २०२३) पर्यंत नोंद असुन आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासनाकडून मदत मिळण्यासाठी सुद्धा दिरंगाई होत आहे.

बीड शहरातील मुख्य चौक छत्रपती शिवाजी महाराज चौकातील अनाधिकृत होर्डिंग्ज व बॅनर मुळे वाहतुकीस अडथळा व अपघातांचे प्रमाण वाढलेले असुन संबंधित प्रकरणी वारंवार निवेदने तसेच आंदोलना नंतर सुद्धा मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाची अवमानना करत शहर विद्रूपीकरण कायद्याअंतर्गत कारवाईस मुख्याधिकारी नगरपरिषद बीड हे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत.त्यामुळे संबंधित प्रकरणी जबाबदार मुख्याधिकारी नगरपरीषद बीड यांच्यावर प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करण्यात यावी.बीड जिल्ह्यातील विविध भुसंपादन कार्यालयामार्फत जिल्ह्यातील वृत्तपत्रांना शासकीय प्रकल्प राबविण्यासाठी भुसंपादित करण्याकरीता शासकीय जाहिराती देण्यात येतात.मागील काही वर्षांतील आणि चालु कालावधीतील अनेक रोजगार हमी योजना भुसंपादन जाहिरातीची वृत्तपत्रांची देयके केवळ यंत्रणांच्या निष्काळजी पणामुळे प्रलंबित राहिली असुन एकुण रक्कम २ कोटी रुपयांपर्यंत असुन अनेकदा मागणी करूनही देण्यात आली नाहीत .दि.१५ आगस्ट २०२० रोजी संबंधित प्रकरणी संपादकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले होते तेव्हा तत्कालीन पालकमंत्री बीड धनंजयजी मुंडे यांनी प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले होते.परंतु प्रश्न मार्गी लागला नाही.दि.०४ आक्टोबर २०२३ रोजी संपादकांनी मुंबई येथे पालकमंत्री धनंजयजी मुंडे यांची भेट घेऊन निवेदन देत विनंती केली होती मात्र तेव्हा सुद्धा बैठक लावुन प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले होते.परंतु अद्याप कोणतीही उपाययोजना करण्यात आली नाही त्यामुळे संपादकांनी दि.१ डिसेंबर २०२३ रोजीच्या शासन आपल्या दारी परळी येथील तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्या संदर्भात प्रशासनाला निवेदन दिले आहे.त्यामुळे जनतेच्या समस्या मांडणा-या वृत्तपत्र संपादकांना शासन दरबारी हेलपाटे मारूनही न्याय मिळत नाही आणि शासन आपल्या दारी कार्यक्रमाच्या माध्यमातून कोट्यवधींचा खर्च म्हणजे सर्वसामान्य जनतेची थट्टा करण्याचा प्रकार असुन तातडीने शासकीय जाहिरातीची देयके देण्यात यावीत.



# टाकरवन येथे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन

टाकरवन। ।वचिष्ट आठवे

माजलगाव तालुक्यातिल टाकरवन येथे संत सावता माळी चौक येथे जयंती निमित्त स्त्री शिक्षणासाठी समानता व सत्यासाठी देह झिजवनारे क्रांतिसूर्य थोर समाजसेवक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करूण अभिवादन करन्यात आले यावेळी सरपंच सुनील नाना तौर. दत्ता दादा भुंबे.आशोक भाऊ गोबरे.महादेव कदम.अशोक खुळे.कपिल आडागळे.भागवत कोरडे.प्रभाकर भुंबे.सारंग गोबरे.कैलास लव्हाळे.सचिन कदम.राहुल भुंबे सकाभाऊ गोबरे. सुग्रीव कोरडे. रवी भुंबे.वैभव कदम. ऋषिकेश भुंबे.गोविंद गोबरे.रामेश्वर कदम आदिनाथ कदम यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थिति होते.



मानवी हक्क अभियान मुख्य कार्यालय तेलगाव या ठिकाणी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृतीदिना निमित्त अभिवादन केले.

# गारपीट व अवकाळी पावसाने शेतकरी चिंताग्रस्त पण धनंजय मुंडे शेतकरी बाधवासाठी सरसावले

महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये निसर्गाने गेल्या पाच वर्षांमध्ये सतत वेळोवेळी पावसाने पाठ फिरवली तर कधी निसर्गाने देत भयंकर परिस्थिती शेतकऱ्यांवरती आणलेली आहे यामध्ये महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सरकारमध्ये सदैव कटिबद्ध राहून न्याय देण्यासाठी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी वेगवेगळे खाद्य सांभाळत महाराष्ट्रातील जनतेची सेवा करण्यासाठी सदैव आपण कटिबद्ध असल्याने त्या ठिकाणी त्यांनी सुमारे गेल्या पाच ते दहा वर्षांमध्ये वेगवेगळ्या सरकारमध्ये राहत सदैव महाराष्ट्रातील जनतेचे व शेतकऱ्यांचे हित जोपासले आहेत यामध्ये या दोन चार दिवसांमध्ये झालेल्या गारपीट व अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे धनंजय मुंडे हे महाराष्ट्राचे भूमिपुत्र असल्याने बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील सर्वच गारपीट झालेल्या जिल्ह्यांमध्ये धनंजय मुंडे यांनी स्वतः लक्ष घालून शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी पाऊल उचलले आहे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस व शासन दरबारी संबंधित अहवाल सादर करून शेतकऱ्यांच्या झालेल्या पिकांना व राज्यातील सुमारे १६ ते १७ जिल्ह्यांमध्ये मागील दोन दिवसात अवकाळी पाऊस व गारपीट झाल्याने हजारो हेक्टर शेती बाधित झाली असल्याचे वृत्त आहे; तसेच आणखी पुढचे काही दिवस अवकाळी पावसाचा अंदाज आहे. या अवकाळी व गारपीटीने रब्बीतील कापूस,




कांदा, द्राक्ष, केळी, मोसंबी, डाळिंब, काढणीस आलेला भात, ज्वारी, गहू, हरभरा यांसह भाजीपाला आदी पिकांचे नुकसान झाल्याचेही निदर्शनास आले आहे.कृषी, मदत व पुनर्वसन आणि महसूल विभागाच्या वतीने झालेला पाऊस व त्यामुळे झालेले नुकसान याची वस्तुनिष्ठ माहिती संकलित करण्याचे काम सुरू आहे. जिथे शेतकऱ्यांचे नुकसान झाले असेल तिथे मदत करण्यासाठी शेतकऱ्यांच्या खंबीरपणे पाठीशी उभे राहण्याची शासनाची भूमिका आहे.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT